## माहिती पत्रक २०१९-२०

इ. स. २०१९-२० ह्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत! विद्यापीठ अनुदान आयोग व क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांच्या निर्देशानुसार मू. जे. महाविद्यालयात शैक्षणिक स्वायत्ततेचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी ही 'एक प्रगल्भ शैक्षणिक चळवळ' आहे. खान्देशातील विविध शैक्षणिक संस्थापैकी, उद्यतम शैक्षणिक मूल्ये जोपासणाऱ्या खान्देश एज्युकेशन सोसायटीचे 'मूळजी जेठा महाविद्यालय' हे नामांकित, अग्रगण्य असे महाविद्यालय आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरा असलेल्या ह्या महाविद्यालयात, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे आणि क्षमतेनुसार शिक्षण घेता यावे, म्हणून अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे आणि त्या शिक्षणातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, ह्यासाठी येथे अतिशय उत्कृष्ट असे शैक्षणिक वातावरण आहे. आपला पाल्य हा महाविद्यालयात शिक्षण घेऊन पदवी प्राप्त करतांनाच चारित्र्यसंपन्न, सुजाण व सुसंस्कृत नागरिक होईल, अशी आम्ही पालकांना निश्चितपणे खात्री देतो. आता स्वायत्तेमुळे प्रत्येक विद्यार्थ्यांला आपल्या आवडीप्रमाणे अभ्यासक्रम निवडण्याची मूभा मिळणार आहे **(CBCS) Choice Based credit system** अवलंबल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात उपयोगी पडणाऱ्या, कौशल्याधारित विषयांची निवड करता येणार आहे.

आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पुणे, मुंबई येथे जावे लागू नये म्हणून येथेच उत्तम दर्जाचे शिक्षण देता येईल, ही विद्यार्थीहिताची दूरदृष्टी ठेऊन काही विचारवंतांनी इ.स.१९४४ मध्ये खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. ह्या योजनेनुसार इ.स.१९४५ मध्ये मू. जे. महाविद्यालय सुरु झाले. आजतागायत ७४ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत मू. जे. महाविद्यालयाने आपली स्वतंत्र ओळख प्रस्थापित केली आहे, स्वतःचे स्थान निर्माण केलं आहे. पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन क्षेत्रापर्यंत विविध अभ्यासक्रम येथे सुरु आहेत. बदलत्या काळानुसार, कौशल्याधारित अभ्यासक्रमाची गरज लक्षात घेऊन, ह्या महाविद्यालयात विविध शैक्षणिक अभ्यासकमांबरोबरच **B. Voc.** सारखा अभ्यासक्रमही शिकविला जातो.

शिक्षणाबाबतच्या साऱ्या सुविधा, विविध विषयांचे पूर्ण नाविनय अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या भावी जीवनातील महत्त्वाकांक्षा पूर्ण होऊ शकतील ह्याची खात्री असल्यामुळे आज सुमारे ८५०० पेक्षाही जास्त विद्यार्थी ह्या महाविद्यालयात आपल्या आवडीनुसार, आनंददायी शिक्षणाचा अनुभव घेत आहेत. मू. जे. महाविद्यालय आणि हा परिसर एक संस्कारक्षम केंद्र म्हणून किती आकर्षक, महत्त्वपूर्ण आहे, ह्याची प्रस्तुत माहितीपत्रकावरून आपल्याला सहज कल्पना येईल.

आजच्या स्पर्धात्मक वातावरणात 'सर्वोत्तम तोच टिकेल' ह्या तत्त्वानुसार, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देऊन, त्यांच्या ठिकाणी सर्वसमावेशकतेचा यथार्थ, व्यापक दृष्टिकोन निर्माण करणे, हे आमचे ध्येय आहे. 'केंद्रीय लोकसेवा आयोग', 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग' आणि अन्य स्पर्धात्मक परीक्षांसाठी 'ज्ञानज्योत' ह्या संस्थेद्वारे महाविद्यालयातच प्रशिक्षण दिले जाते. ह्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण, सर्जनशीलता जागृत करणारे आणि नैतिक मूल्याधारित असेच शिक्षण दिले जाते. भावी आयुष्यात येणारी आव्हाने समर्थपणे पेलता यावीत, म्हणून विद्यार्थ्यांसाठी येथे अभ्यासपूरक आणि अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन केले जाते. ह्या महाविद्यालयातील सुरेख वातावरण, वैविध्यपूर्ण सुविधा आणि तज्ज्ञ, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन ह्यामुळे विद्यार्थ्याला उकृष्ट शैक्षणिक अनुभवाचा प्रत्यय येतो, हे आम्ही अभिमानानं नमूद करतो.

सुमारे २९ एकरांच्या विस्तीर्ण जागेत वसलेल्या ह्या परिसरात कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालय, सुसज्ज ग्रंथालय, अद्ययावत प्रयोगशाळा, वसतिगृह, स्पर्धा परीक्षा केंद्र, सोहम् योग केंद्र, योग व निसर्गोपचार हॉस्पिटल, ओजस्विनी ललित कला विभाग, विविधता संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र एकलव्य क्रीडा संकुल, विद्यार्थी ग्राहक भांडार, जलतरण तलाव आणि बँक ह्यांचा समावेश आहे.

शैक्षणिक उपक्रमांबाबत अत्यंत सजग आणि दुरदृष्टीकोन असलेले संस्थेचे विद्यमान अध्यक्ष 'प्रज्ञावंत' श्री. नंदकुमार बेंडाळे त्यांचे नेतृत्व आम्हाला प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने महाविद्यालय, दिवसेंदिवस प्रगतीची, यशाची उत्तुंग शिखरे काबीज करीत आहे.

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त मंडळाचेही मू. जे. महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान आहे. त्यामुळेच महाविद्यालय **'College of Excellence'** हा दर्जा प्राप्त झाला आहे.

मू. जे. महाविद्यालय म्हणजे "विद्यार्थ्यांच्या आकांक्षा पूर्णत्वाकडे नेणारे, त्यांना स्वतःच्या बळावर झेप घेऊ देण्याइतके सक्षम करणारे, संस्कार केंद्र आहे". हे विधान अतिशयोक्तीपूर्ण होणार नाही, ह्याची आम्हाला खात्री आहे.

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी आणि मू. जे. महाविद्यालयाच्या समस्त प्राध्यापकांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे, मी मनःपूर्वक स्वागत करतो. ह्या महाविद्यालयात उत्तम प्रकारे शिक्षण घेऊन तुम्ही सुसंस्कृत, सुसंपन्न होऊ शकाल, असे प्राचार्य म्हणून, मी तुम्हाला आश्वस्त करतो.

तुम्हा सर्वांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा!

**डॉ. उदय कुलकर्णी**
**प्राचार्य**

## आमची वैशिष्ट्ये

## आमची बलस्थाने

**नॅक अ श्रेणी** (CGPA 3.15)

मूळजी जेठा महाविद्यालयाचे २०१८ साली नॅक संस्थेमार्फत तिसऱ्यांदा पुनर्मूल्यांकन झाले. त्या पुनर्मूल्यांकनाच्या आधारे महाविद्यालयास 'A' श्रेणी (सीजीपीए - ३.१५) हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

## 'उत्कृष्टता दर्जा' प्राप्त महाविद्यालय

शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'उत्कृष्ट शैक्षणिक महाविद्यालय' हा दर्जा विद्यापीठ अनुदान आयोगाने १२ व्या योजने अंतर्गत देऊन मूळजी जेठा महाविद्यालयाला मानांकित केलेले आहे. हा दर्जा प्राप्त झालेली ही संस्था संपूर्ण देशातील पहिल्या दहा महाविद्यालयापैकी एक आहे. या योजनेअंतर्गत महाविद्यालयातील शैक्षणिक व अंतर्गत सुविधा, अध्यापन, संशोधन तसेच समाजोपयोगी उपक्रमांची गुणवत्ता वाढ याकडे विशेष लक्ष देता आले आहे. तसेच यामुळे भविष्यात आंतर- विद्याशाखीय आणि आंतर विद्यापीठीय संशोधन प्रकल्प, संशोधन केंद्रे आणि औद्योगिक संस्था यांचे संलग्नीकरण होऊ शकेल.

## ISO:9001:2015 प्रमाणपत्र

महाविद्यालयाने ISO 9001:2015 हे प्रमाणपत्र ऑक्टोबर २०१५ मध्ये, संस्थेच्या व्यवस्थापनाच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी तिसऱ्यांदा प्राप्त केलेले आहे.

## अद्ययावत प्रयोगशाळा

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जीवरसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञानशास्त्र, भूगोल, इलेक्ट्रॉनिक्स, संख्याशास्त्र या सर्व विभागांमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा तसेच **AAS, GC, HPLL, PCR, FTIR** सारखी साधने आमच्याकडे संशोधनासाठी उपलब्ध आहेत.

## उच्च दर्जाच्या अंतर्गत सुखसोयी

महाविद्यालयात उत्कृष्ट दर्जाचे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाप्रती आवड निर्माण करण्यासाठी, ध्येय गाठण्यासाठी व संशोधनासाठी चांगल्या सोयी सुविधा पुरविण्यासाठी, येथे अत्याधुनिक शैक्षणिक उपकरणे उदा. स्लाईड, ओव्हरहेड, एलसीडी व फिल्म प्रोजेक्टर्स, सिन्क्रो रेकॉर्डर इ. उपलब्ध आहेत. प्रत्येक विभागासाठी आधुनिक संगणक व इंटरनेट प्रणाली उपलब्ध करून दिलेली आहे.

## मुख्य ग्रंथालय

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ क्षेत्रातील विपुल ग्रंथसंपदा असलेलं आमचं ग्रंथालय आहे. ग्रंथालयात १ लाख ५४ हजारापेक्षा अधिक पुस्तके आहेत. तसेच ११४ प्रकारची मासिके, ६००० संशोधनासाठीची इ–नियतकालिके उपलब्ध केली आहेत. तसेच इंटरनेट प्रणालीमधून मिळणारी 'एन–लिस्ट' सेवा ही इन्फ्लीबनेटद्वारे विद्यार्थ्यांना ३१३५००० पुस्तके उपलब्ध करून देते.

आमच्या ग्रंथालयात दृकश्राव्य साधनांचा मोठा संचय असून वेगवेगळ्या विषयांशी संबंधित संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचन कक्षाची सोय तसेच पुस्तकांची यादी ऑनलाईन प्रणालीमधून पाहता येते. विद्यार्थी इंटरनेटव्दारे ऑनलाईन पुस्तके वाचू शकतात. वाचन कक्षात सकाळी ७.३० ते रात्री १२ पर्यंत विद्यार्थी अभ्यास करू शकतात. पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास सात दिवसासाठी एक पुस्तक घरी वाचनासाठी देण्यात येते तर पदव्युतर शिक्षण घेणारे विद्यार्थी एक वेळेस दोन पुस्तके घरी नेऊ शकतात.

## 'यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक' अभ्यास केंद्र

आमच्या महाविद्यालयात १९९० पासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित आहे. ह्या अभ्यासकेंद्रात पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी पूर्व तयारी अभ्यासक्रम तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे वाणिज्य व कला विभागाचे अभ्यासक्रम शिकविले जातात.

जे विद्यार्थी १० वीची परीक्षा उत्तीर्ण झाले असतील परंतु १२ वी अनुत्तीर्ण असतील अशा विद्यार्थ्यांना या विद्यापीठाचा पूर्वतयारी अभ्यासक्रम उत्तीर्ण करावा लागतो. त्यानंतरच विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेता येतो. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास आणि ग्राहक संरक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रवेश घेवू शकतात.

तसेच येथे व्हर्चुअल क्लासरूम द्वारे मार्गदर्शनही दिले जाते.

## IGNOU

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून महाविद्यालयात 'इंदिरा गांधी ओपन युनिव्हर्सिटी' **(IGNOU)** चे स्टडी सेंटर सुरु झालेले आहे. त्यामुळे नोकरी करणाऱ्या किंवा दुरशिक्षणाची आवड असणाऱ्यांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. एकूण १२ अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले आहेत यामध्ये संगीत, ललित कला **(Fine Art)** नाट्य शास्त्र, तत्वज्ञान, मानसशास्त्र, ग्रंथालय व माहिती शास्त्र, ॲनॅलेटिकल केमेस्ट्री, पर्यावरणशास्त्र आणि जलसंवर्धन व व्यवस्थापन या विषयांचा अंर्तभाव आहे.

## ड्रीमी आईज सेंटर (दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी)

दृष्टी नसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय या महाविद्यालयात उपलब्ध आहे. त्यासाठी ५ आधुनिक संगणक डिजिटल लर्निंग रिसोर्सेस ॲक्सेस सेंटर **(DLRAC)** मध्ये उपलब्ध आहेत. हे ५ संगणक फक्त अंध लोकांसाठीच वापरले जातात.

## एज्युकेशन मिडिया डेव्हलपमेंट सेंटर (EMDC)

महाविद्यालयात अध्ययन व अध्यापनासाठी, उपयुक्त नोंदी करण्यासाठी स्वतंत्र मध्यवर्ती सुविधा केंद्र आहे. या केंद्रात संगणक, कलर प्रिंटर, स्कॅनर, एलसीडी प्रोजेक्टर, इंटरनेट, व्हिडीओ कॅमेरा, रेकॉर्डींगची सुविधा, दृकश्राव्य माध्यम, इ. उपलब्ध आहे.

## जलश्री – एक नवीन शैक्षणिक उपक्रम

जलश्री **(JalaSRI)** – वॉटरशेड सर्व्हेलिअन्स ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट – ही नाविन्यपूर्ण आणि विविध विषयांचे संशोधन करणारी एकमेव संस्था आहे. पाणी व्यवस्थापन आणि निसर्गातील विभिन्न उर्जास्त्रोतांचा अभ्यास करुन समाजोपयोगी उपक्रम राबविणारी ही संस्था आहे. जळगावातील पाणी, पर्यावरण, जमीन, माती संबंधीचे विविध संशोधन प्रकल्प या संस्थेने हाती घेतलेले आहेत. ह्या संस्थेद्वारे पेनसिल्व्हेनिया विद्यापीठ (अमेरिका) आणि आणि मिलान सिटी कौन्सिल (इटली) यांच्या विद्यमाने संशोधन प्रकल्प पूर्ण झालेले आहेत आणि अनेक प्रकल्प सध्या कार्यान्वित आहेत. 'जलश्री' च्या अद्ययावत संशोधन प्रयोगशाळेत आर्क जीआयएस (ARCGIS) आणि इराडस इमॅजिन (ERDAS Imagine) सारखी साधने संशोधनासाठी उपलब्ध आहेत.

## राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन

विविध विषयांवर आधारित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन या महाविद्यालयात दरवर्षी केले जाते. गेल्या वर्षी या महाविद्यालयाने दोन राष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले.

## राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प

विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्पावर आमचे प्राध्यापक संशोधन करीत असतात. काही संशोधन प्रकल्प राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या सहकार्याने राबविले जात आहेत.

## सृजनशील शैक्षणिक उपक्रम

### विविधता संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र

विविधता ह्या शब्दात विश्‍व, विज्ञान, धर्म, तात्त्विक अधिष्ठान ह्या संकल्पना गृहित आहेत. आजच्या युवकांमध्ये विश्वात्मकतेची व आध्यात्मिकतेची भावना रुजविणे, त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, मानवी मूल्ये आणि तत्त्वज्ञान यांची सांगड घालणे हे या संस्थेचे ध्येय आहे. यासाठी विविध उपक्रम हाती घेतलेले आहेत.उदा.:

- वैदिक गणिताच्या कौशल्यातून स्पर्धा परीक्षेतील गणिते विद्यार्थी लीलया सोडवू शकतो म्हणून वैदिक गणित पध्दती शिकविणे.
- विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान यांचे परिचय करून देणे व त्याविषयी रूचि निमार्ण करणे.
- व्यक्तिमत्त्व विकास उपक्रम राबविणे
- वेगवेगळी कौशल्ये विकसित करणे उदा. शब्दसंग्रह वाढविणे, संवाद कौशल्य, सभाधीटपणा, स्मरणशक्ती वाढविणे, इ.

## B.Voc. पदवी अभ्यासक्रम

विद्यार्थ्यांसाठी कौशल्यावर आधारित 'बॅचलर ऑफ व्होकेशन' या अभ्यासक्रमांतर्गत 'ग्रीन हाऊस, प्रिंटींग टेक्नॉलॉजी, ॲग्रीकल्चर व फ्लोरीकल्चर व बाग हे विषय सुरू करण्यात आले आहेत. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने १२ व्या योजनेअंतर्गत आर्थिक साहाय्य उपलब्ध करून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नता दिलेली आहे. कोणताही १२वी उत्तीर्ण विद्यार्थी या अभ्यासक्रमास प्रवेश घेवू शकतो. शंभर टक्के नोकरी देणारे हे अभ्यासक्रम आहेत.

## 'उदयोन्मुख संशोधक' योजना

पदवी तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाप्रती आवड निर्माण करण्यासाठी ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत विद्यार्थी उन्हाळ्याच्या सुटीत त्यांच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन प्रक्रिया शिकतात. त्यासाठी विद्यार्थ्यांना काही आर्थिक मदत व आवश्यक संशोधन साहित्य पुरविले जाते. त्यानंतर हे प्रकल्प तज्ज्ञांकडून तपासले जातात. त्यातून उत्कृष्ट तीन प्रकल्पांची बक्षिसासाठी निवड केली जाते. हे संशोधन प्रकल्प ISBN नंबर असलेल्या ग्रंथात समाविष्ट केले जातात.

## विद्यार्थ्यांसाठी सुविधा

### स्मार्ट क्लासरूम

उच्चशिक्षणातील अध्ययन व अध्यापनाची प्रक्रिया परिणामकारकरित्या घडवून आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'स्मार्ट क्लासरूम'ची उपलब्धता महाविद्यालयाने करून दिली आहे. स्मार्ट क्लासरूम अध्यापनाव्दारे प्रत्यक्ष गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ देता येतो. याठिकाणी विद्यार्थी इंटरनेट व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे व आपल्या सोयीने

बरेच काही शिकू शकतो. विद्यार्थीसंख्या आणि विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेता आमच्याकडे ३० स्मार्ट क्लासरुम्सची व्यवस्था आहे.

## विभागातील - विभागीय ग्रंथालय

विद्यार्थ्यांना विषयांची पुस्तके व संदर्भग्रंथ सहजतेने उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक विभागामध्ये स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध आहे.

## पुस्तक -पेढी योजना

महाविद्यालयात पुस्तक पेढी योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात.

## वसतिगृह आणि भोजनकक्ष सुविधा

विद्यार्थी / विद्यार्थिनींची स्वतंत्र निवासाची आणि भोजनाची व्यवस्था महाविद्यालयाच्या आवारातच करण्यात आलेली आहे. गुणवत्तेच्या निकषांवर वसतिगृहात प्रवेश दिला जातो. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या व गरजू विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या शुल्कात सवलत दिली जाते. तसेच महाविद्यालयात शिकत असतांना 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत निवासव्यवस्था पुरविण्यात येते.

## उपहारगृह

विद्यार्थ्यांच्या पोषक आहार व भोजन पुरविण्यासाठी कँटीनची सुविधा महाविद्यालयाच्या आवारातच करण्यात आली आहे. या ठिकाणी पौष्टीक आहार विद्यार्थ्यांना तसेच प्राध्यापकांसाठी उपलब्ध आहे.

## 24 X 7 विद्युत पुरवठा

विद्युत पुरवठा अखंड व नियमित मिळावा म्हणून महाविद्यालयाच्या आवारात २४X७ विद्युत जनरेटरची सोय आहे.

## RO - पिण्याचे पाणी

विद्यार्थ्याच्या तसेच शिक्षकांच्या आरोग्याची काळजी म्हणून पाणी शुद्धिकरणाचा प्रकल्प (आर.ओ.-वॉटर) महाविद्यालयात उभारलेला आहे.

## वैद्यकीय सुविधा

'मदर टेरेसा' हे वैद्यकीय सेवा केंद्र आमच्या महाविद्यालयाच्या आवारात उपलब्ध आहे. सर्व विद्यार्थी व प्राध्यापक याचा लाभ घेवू शकतात.

## बँकेची सुविधा

महाविद्यालयाच्या आवारात बँक ऑफ महाराष्ट्र आणि जळगाव पिपल्स को. ऑपरेटिव्ह बँक, यांच्या शाखा आहेत. या शाखा विद्यार्थ्यांना विविध सेवा पुरवितात.

## सहकारी ग्राहक भांडार

विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी हे सहकारी ग्राहक भांडार महाविद्यालयातच उपलब्ध आहे. आवश्यक शैक्षणिक साहित्य, जर्नल्स, चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिका वगैरे या ग्राहक भांडारात उपलब्ध आहेत.

## अद्ययावत प्रयोगशाळा

विज्ञान विद्याशाखेच्या विविध प्रयोगशाळांमध्ये प्रयोगासाठी आवश्यक असणारी सर्व आधुनिक उपकरणे या मुख्य प्रयोगशाळेत उपलब्ध आहेत.

## भव्य क्रीडांगण

आमच्या महाविद्यालयात विविध खेळांसाठी प्रशस्त मैदाने उपलब्ध आहेत. उदा. खो-खो, फुटबॉल, क्रिकेट, कबड्डी, बास्केट बॉल, इ. खेळांच्या विविध स्पर्धा या मैदानावर आयोजित केल्या जातात. एकलव्य क्रीडा संकुलात शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने अद्ययावत सुविधा उपलब्ध आहेत. त्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षक नेमण्यात आलेले आहेत. जळगाव शहर व परिसरातील जवळजवळ १००० विद्यार्थी व नागरिक या सुविधांचा लाभ घेत आहेत. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्व खेळांसाठी शुल्कामध्ये सवलत दिलेली आहे. आमच्यासाठी ही अभिमानाची बाब आहे की आमचे एकलव्य क्रीडा संकुल केंद्राला सरकारच्या क्रीडाधिकार मंडळाची (SAI) मान्यता आहे आणि आमचे संकुल बॅडमिंटन प्रशिक्षणाचे केंद्र आहे. ऑलिपिंक दर्जाचा पोहण्याचा तलाव नुकताच सुरू करण्यात आला आहे. यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये जळगावच्या विद्यार्थ्यांचा सहभाग दिसून येईल. तसेच बंदिस्त नेमबाजीचे केंद्र Shooting Range (अद्ययावत सामग्रीसह) आहे, ज्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार होत आहेत.

## इंग्रजी संवाद कौशल्य आणि भाषा प्रयोगशाळा

इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना संगणकीय भाषा प्रयोगशाळा उपलब्ध आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना श्रवण, वाचन, लेखन आणि संवाद कौशल्य विकसित करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. इंग्रजी उच्चार आणि संभाषण करण्याची संधी मिळते.

## 'वाय-फाय कॅम्पस्' (Wi-Fi Campus)

महाविद्यालयाच्या संपूर्ण आवारात २४X७ हायस्पीड वाय-फाय इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. ही सुविधा विद्यार्थी, प्राध्यापक, तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी २४ तास उपलब्ध आहे.

## संगणकीय सुविधा केंद्र

विद्यार्थ्यांना त्यांचे प्रवेश अर्ज / शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी लागणारी सर्व संगणक यंत्रणा आम्ही पुरवितो. उदा. कॉम्प्युटर, स्कॅनर, प्रिंटर, इंटरनेट सुविधा, इ.

## व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम

शिकत असतांनाच विविध व्यवसायांची ओळख करून देणाऱ्या व व्यवसायासाठी उपयुक्त ठरणारे ४० पेक्षा जास्त अभ्यासक्रम महाविद्यालयात शिकविले जातात. ते उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित आहेत व पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतांनाही एकाचवेळी पूर्ण करता येतात.

## उजळणी वर्गाची व्यवस्था

समाजातील कमकुवत वर्ग तसेच अभ्यासात मागे असलेल्या असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत उजळणी वर्ग घेतले जातात.

## आर्थिक मदत आणि शिष्यवृत्ती

विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी महाविद्यालयात अनेक शिष्यवृत्ती योजना आहेत, त्या खालीलप्रमाणे -

### अ) केंद्र/राज्य सरकार शिष्यवृत्ती/फी सवलत

भारत सरकार शिष्यवृत्ती/फी सवलत,एकलव्य शिष्यवृत्ती,हिंदी शिष्यवृत्ती,राष्ट्रीय बुध्दिमत्ता शोध शिष्यवृत्ती,अपंग शिष्यवृत्ती,राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती, आर्थिकदृष्टया मागासवर्गासाठी शिष्यवृत्ती,क्रीडा शिष्यवृत्ती,ग्रामीण भागातील हुशार विदयार्थी शिष्यवृत्ती,प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना शिष्यवृत्ती, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना, राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना इ.

### ब) महाविद्यालयाकडून आर्थिक मदत

गरीब विद्यार्थी मदत योजना, देणगीतून दिली जाणारी पारितोषिके व शिष्यवृत्ती, कमवा व शिका योजनेअंतर्गत मदत (शिष्यवृत्तीसाठी काही नियम व अटी बंधनकारक आहेत) व त्या सूचना फलकावर योग्य वेळी लावण्यात येतात.

### क) स्वर्गवासी डॉ. अण्णासाहेब बेंडाळे शिष्यवृत्ती

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जी.डी. बेंडाळे तथा अण्णासाहेब हे आमच्या संस्थेचे प्रेरणादायी श्रध्दास्थान होते आणि ते संस्थेचे ४० वर्षाहूनही अधिक वर्षे संस्थेचे अध्यक्ष होते. २००४-०५ मध्ये श्रीमती शालिनीताई बेंडाळे ह्यांचेकडून डॉ. जी.डी. बेंडाळेंच्या स्मृती प्रित्यर्थ देणगी देण्यात आली आहे. डॉ. जी.डी. बेंडाळें यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिली जाणारी ही शिष्यवृत्ती संस्थेत शिक्षण घेत असलेल्या हुशार व होतकरू विद्यार्थ्यास दिली जाते.

## कमवा व शिका योजना

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गरीब, गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांस उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालयाने 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' सुरु केलेली आहे. या योजनेअंतर्गत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नियमानुसार जे विद्यार्थी काही तास महाविद्यालयामध्ये काम करतात, त्यांना आर्थिक मदत दिली जाते. कामाचे तास ते शिकत असलेल्या अभ्यासक्रमानुसार सोयीने दिले जातात. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि मू. जे. महाविद्यालय यांनी मिळून रक्कम उभारलेली आहे. गरजू विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास महाविद्यालयाच्या वतीने त्यांना आर्थिक मदतही दिली जाते.

## राष्ट्रीय छात्रसेना

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना युनिट १९५४–५५ पासुन कार्यान्वित आहे. १६ महाराष्ट्र बटालियन अंतर्गत आमच्या महाविद्यालयात १६४ विद्यार्थी आणि ५५ विद्यार्थिनी एन.सी.सी. चे शिक्षण घेत आहेत. ६२ विद्यार्थी आणि १८ विद्यार्थिनींनी आता पर्यंत आमच्या महाविद्यालयाचे तसेच राष्ट्रीय छात्रसेना (जळगांव) चे प्रतिनिधित्व भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त पथसंचलनासाठी दिल्ली येथे, तसेच थल सेना कॅम्प, नवी दिल्ली येथे केले आहे. काही छात्रसैनिकांनी प्रजासत्ताक दिनी दिला जाणारा राष्ट्रपती पुरस्कारसुध्दा मिळविलेला आहे. इतर काही विद्यार्थ्यांनी एन.सी.सी.च्या युथ एक्स्चेंज प्रकल्पांतर्गत विदेशातही प्रतिनिधित्व केलेले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना १९७२ मध्ये महाविद्यालयात कार्यान्वित झाली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यासाठी महाविद्यालयात तसेच महाविद्यालयाबाहेर विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. हे उपक्रम पुढीलप्रमाणे..

१) परिसर सुशोभिकरण २) वृक्ष लागवड ३) एड्स जागृती मोहीम ४) प्रौढ शिक्षण ५) सायकल मोर्चा ६) पथनाट्य ७) उजळणी वर्ग ८) व्यक्तिमत्त्व विकास शिबिर ९)रक्तदान शिबिर १०) अंधश्रध्दा निर्मुलन मोहीम ११) व्यसनमुक्ती अभियान १२) ग्राहक जागृती मोहीम.

आजपर्यंत राष्ट्रीय सेवा योजनेत काम करणाऱ्या काही स्वयंसेवकांना प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे होणाऱ्या पथसंचलनासाठी तसेच राष्ट्रीय शिबिरामध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालेली आहे. तसेच काही स्वयंसेवकांनी युथ एक्स्चेंज प्रकल्पांतर्गत विदेशात देखील भेटी दिलेल्या आहेत.

## हरित सेना

महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी योजलेल्या 'हरित सेना' च्या प्रकल्पात मू. जे. चे विद्यार्थी सामील झालेले आहेत. वृक्ष लागवडीसाठी निरनिराळे प्रकल्प राबविले जात आहेत.

## विद्यार्थी परिषद

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ २०१६ कायद्यानुसार व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सुचनेनुसार विद्यार्थी परिषदेची निमिर्ती केली जाते. विद्यार्थी प्रतिनिधी मधून अध्यक्ष, सचिव निवडले जातात. यावर्षापासून विद्यार्थी परिषदेसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. यामुळे लोकशाही मूल्यांचे संस्कार भावी पिढीवर होतील अशी आमची खात्री आहे.

## विद्यार्थ्यांसाठी तक्रार निवारण कक्ष

विद्यार्थ्यांचे प्रश्न विचारात घेण्यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. ठिकठिकाणी महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांसाठी 'तक्रारपेट्या' ठेवलेल्या आहेत आणि दर पंधरा दिवसांनी या तक्रारींची योग्य ती दखल घेवून कारवाई केली जाते.

## विद्यार्थी मार्गदर्शन आणि नोकरी / व्यवसायविषयक समुपदेशन

विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करता यावे, त्यांच्या समस्यांचे निराकरण करता यावे, ह्यासाठी स्वतंत्र समुपदेशन केंद्र महाविद्यालयात कार्यान्वित आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते व विविध प्रकारच्या मुलाखती आयोजित केल्या जातात आणि त्यासंबंधीची स्वतंत्र पुस्तिका प्रकाशित केली जाते. ह्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होऊ शकते. विविध कंपन्यांद्वारे महाविद्यालयातील परिसरात विद्यार्थ्यांच्या मुलाखतीचे नोकरीच्या दृष्टीने आयोजन केले जाते.

## महात्मा गांधी अध्ययन केंद्र

महात्मा गांधी अध्ययन केंद्र हे सामाजिक बंधुत्व व स्त्री सबलीकरण यांचा समाजात प्रसार करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे. या केंद्राद्वारे श्रम शिबिरांचे व युवक प्रेरणा शिबिरांचे आयोजन केले जाते यामुळे स्वावलंबनाचे महत्त्व तरुणांना पटवून दिले जाते.

या UGC प्रकल्पाच्या नियत कालावधीनंतर कॉलेजने सदर योजनेस स्वतःच्या अनुदानातून अर्थ साहाय्य करून तो सुरू ठेवला आहे.

हे केंद्र म्हणजे गांधी विचारांचे अध्ययन केंद्र व ग्रंथालयही आहे. यामध्ये गांधींची अनेक पुस्तके वाचावयास ठेवलेली आहेत. ह्या केंद्राद्वारे ३ ते ६ महिन्याचा अर्धवेळ प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे जो विद्यार्थ्यांना, शासकीय व बिगर शासकीय अधिकाऱ्यांना तसेच सामाजिक कार्यकर्त्यांना गांधीच्या विचारसरणीची ओळख होण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच पुढील काळात महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानावर आधारित लेख, पुस्तिका, संशोधन पत्रिका, इ.चे प्रकाशन करण्याचा विचार आहे.

# अभ्यासपुरक आणि अभ्यासेतर उपक्रम

## उद्योग प्रकल्प आणि अभ्यास सहल

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी कार्यानुभव घेण्यासाठी आपल्याच आजूबाजूला असलेल्या उद्योग व्यवसायाच्या ठिकाणी भेट देतात, तसेच उद्योगप्रकल्पांतर्गत विद्यार्थी सुटीच्या काळात कामाचा अनुभव घेतात व त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक जाणीव निर्माण होण्यास मदत होते.

महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांच्या अभ्यास सहली आयोजित करण्यासाठी खास प्रयत्न केले जातात. शाखानिहाय तसेच विभागनिहाय अभ्यास सहली, अभ्यासक्रमांच्या गरजेनुसार आयोजित केल्या जातात.

## व्यक्तिमत्त्व विकास उपक्रम

महाविद्यालयात वेगवेगळ्या समित्यांची उभारणी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करण्यात आलेली आहे उदा. वक्तृत्व स्पर्धा, युवती सभा,साहित्य मंडळ व नियोजन मंडळ. अभ्यासेतर उपक्रमांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, आंतरमहाविद्यालयीन नाट्य महोत्सव, युवारंग, युवा संसद, बुध्दिमत्ता संशोधन परीक्षा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन असे अनेक उपक्रम महाविद्यालयाच्या कार्याचा भाग बनले आहेत.

## सॉफ्टवेअर स्पर्धा / प्रदर्शन

प्रतिवर्षी राष्ट्रीय पातळीवरील सॉफ्टवेअर स्पर्धा महाविद्यालयात आयोजित केली जाते. यात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सॉफ्टवेअरचे प्रदर्शन भरविले जाते आणि उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण प्रकल्पाला पारितोषिक दिले जाते.

## निबंध स्पर्धा / वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा

विविध विषयांशी संबंधित निबंध, वक्तृत्व, वादविवाद स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते जेणेकरुन या विद्यार्थ्यांमधूनच सक्षम लेखक व वक्ते तयार होतील व विद्यार्थ्यांची लेखन क्षमता, भाषण क्षमता विकसित होईल. त्यासाठी भित्तीपत्रके व स्वतंत्र सूचना फलक लावण्यात आलेले आहेत.

## MAESTRO स्पर्धा

प्रतिवर्षी महाविद्यालयातील वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागातर्फे राज्य पातळीवरील MAESTRO स्पर्धा आयोजित केल्या जातात. संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेतात. विद्यार्थी क्षमतांचा विकास व्हावा आणि त्यांना मुख्यत्वेकरून व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले जाते.

## 'चैतन्य' वार्षिक स्नेह-संमेलन

प्रत्येक वर्षी महाविद्यालय वार्षिक स्नेह संमेलनाचे यशस्वीरित्या आयोजन करीत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते आणि त्यांच्या क्षमता विकसित होतात. याप्रसंगी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. उदा. वादविवाद स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा, प्रदर्शने, एकांकिका स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, प्रश्नमंजूषा, रक्तदान शिबिरे, विविध मनोरंजनाचे सांस्कृतिक कार्यक्रम, उत्स्फूर्त भाषण आणि फॅन्सी ड्रेस स्पर्धा, विविध वेष व केशभूषा स्पर्धा, इ.

## व्यक्तिमत्व विकास सुविधा

### ज्ञानज्योत स्पर्धा परीक्षा केंद्र

ज्ञानज्योत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन हे केंद्र सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करते. उदा. युपीएससी / एमपीएससी / जीआरई, बँकिंग, निवड मंडळ, सरकारी सेवा, सुरक्षा, कारकून प्रमाणपत्र परीक्षा, इ. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी संस्थेचे स्पर्धा परीक्षेसंबंधी स्वतंत्र ग्रंथालय आहे व त्यात २००० पेक्षा अधिक संदर्भ पुस्तकाची उपलब्धता आहे. स्वतंत्र वाचनकक्ष व अभ्यासिकेची सुध्दा सुविधा विद्यार्थ्यांसाठी दिलेली आहे. स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी संपूर्ण अंतर्गत व्यवस्था उदा. एल.सी.डी. प्रोजेक्टर, भाषा प्रयोगशाळा, संगणक, इंटरनेट प्रणाली इ. आमच्याकडे उपलब्ध आहे.

## ओजस्विनी ललित कला विभाग

स्वामी विवेकानंद यांना दोन शब्द अतिशय प्रिय होते. ती त्यांची स्फुरणे होती. 'मॅन मेकिंग' आणि 'कॅरेक्टर बिल्डिंग' ही शिक्षणाची प्रयोजने होत असे ते मानत. गेल्या दहा वर्षांपासून 'ओजस्विनी ललित कला विभाग', चित्रकलेची साधना' या गोष्टीला प्राधान्य देत, विविध कोर्सेसच्या माध्यमांतून कलाकार घडवित आहे व यापुढेही घडविणार आहे. कलाकारांच्या कलेचा विकास व्हावा व त्याचबरोबर त्यांची कला रोजगाराशी जोडली जावी व ती आर्थिक स्थैर्थ प्राप्त करून देणारी ठरावी, म्हणून ओजस्विनी विभाग अहोरात्र प्रयत्न करीत आहे.

चित्रकलेची, शिल्पकलेची समज आली पाहिजे व ती दिवसागणिक वाढत व्यक्तिमत्त्व विकास झाला पाहिजे, या हेतूने सुरू केल्या ओजस्विनीत आज विविध कोर्सेस उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांची उद्योग मग्नता व निमार्ण क्षमता वाढीस लागावी व जबाबदार कलाकार म्हणून त्याला स्वावलांबी जीवन जगता यावे, हीच 'ओजस्विनी' च्या निर्मितीमागची प्रेरणा आहे व त्याच प्रेरणेने आज हा विभाग यशस्वीरित्या कार्य करत आहे.

## एकलव्य क्रीडा संकुल

क्रीडाप्रेमींसाठी महाविद्यालयाच्या आवारात प्रशस्त क्रीडामैदान उपलब्ध आहे. त्याचबरोबर सर्व सुविधांनी युक्त असलेले 'एकलव्य क्रीडा संकुल' २००४ मध्ये उभारले आहे. हे संकुल क्रीडाप्रेमींना सर्व सुविधा पुरविते. उदा. १.बॅडमिंटन कोर्ट, २.टेबल-टेनिस कोर्ट, ३.अत्याधुनिक व्यायामशाळा, ४. स्केटिंग रिंग, ५. मल्लखांब, ६. लॉन टेनिस कोर्ट, ७.क्रिकेट मैदान, ८.फुटबॉल मैदान, ९.जिम्नॅस्टिक्स, १०.बास्केटबॉल, ११.तिरंदाजी, १२.बुद्धिबळ, १३.ज्युडो व कराटे, १४. शुटिंग रेंज, स्क्वॅश, इ. या वर्षापासून ऑलिंपिक दर्जाचा जलतरण तलाव व बंदिस्त नेमबाजी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहेत. यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये जळगावच्या विद्यार्थ्यांचा सहभाग भविष्यात दिसणार आहे.

## सोहम् योग व निसर्गोपचार केंद्र

विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि तणाव नियोजन करण्यासाठी महाविद्यालय आवारात योग व निसर्गोपचार केंद्र सुरु केलेले आहे. तसेच योगशास्त्राचे काही अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत जे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक, तसेच योगविद्या गुरुकुल, नाशिकशी संलग्न आहेत. योग विषयांची पदवी (बी.ए.) व पदव्युत्तर शिक्षण (एम.ए.) आमच्याकडे घेता येते. तसेच योगविद्येतील प्रमाणपत्र, पदविका व प्रगत अभ्यासक्रमदेखील उपलब्ध आहेत. तसेच इतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम उदा. ॲरोबिक योग, निसर्गोपचार आणि योगशास्त्र, योगशिक्षक,योग प्रवेश,योग परिचय,योग प्रबोध इ.ची सुध्दा सोय आहे. योग केंद्र विशिष्ट कालावधीचे काही कोर्सेस राबवित असते उदा. बालसंगोपन, गर्भसंस्कार, प्राणायाम शिबिर, षटकर्म शिबिर आणि वेगवेगळ्याा आजारांवर उपयुक्त ठरतील असे योगोपचार चिकित्सा वर्ग चालविले जातात. ह्या वर्षापासून निसर्गोपचार व योगा हे हॉस्पिटल सुरु झाले आहे.

## दूरशिक्षण केंद्र - Virtual Classroom

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील दूरशिक्षण केंद्र आमच्या विद्यार्थ्यांना व्हर्चुअल क्लासरूमव्दारे उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

## नृत्यकला विभाग

आपल्या मूळजी जेठा महाविद्यालयात २०१२-१३ या वर्षी नृत्यकला विभाग सुरु करण्यात आला. नृत्यकला विभागात भारतीय नृत्यकला प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. सदर अभ्यासक्रमात शास्त्रीय नृत्य व लोकनृत्य हे नृत्यप्रकार शिकवले जातात. ह्या सदर कोर्सची पात्रता १२ वी पास व कालावधी १ वर्षाचा आहे.

२०१३-१४ यावर्षी पाश्चिमात्य संगीत व नृत्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम व भारतीय नृत्य पदविका इ. नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

यावर्षांपासमन 'कथ्थक' नृत्यही या विभागात शिकविले जाणार आहे.

## अभ्यासक्रम

### अ) कला विद्या शाखा

- **महाविद्यालयात कला शाखेत पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर विविध विषयांचे अभ्यासक्रम शिकविले जातात.**
- **पदवी स्तरावरील अभ्यासक्रम - बी.ए. (पदवी - कला) कालावधी - ३ वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम आहे.**
- **सविस्तर माहितीसाठी इंग्रजीतील मजकूर पहावा.**

## प्रवेश पात्रता :

### कला विद्या शाखा

● प्रथम वर्ष 'कला' अभ्यासक्रमासाठी १२ वी (कला) प्रमाणपत्र परीक्षा माध्यमिक उच्च - माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र, राज्य यांच्या वतीने आयोजित किंवा समकक्ष परीक्षा (इतर मंडळांची किंवा विद्यापीठांची) इंग्रजी हा आवश्यक विषय घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरतात.

### वाणिज्य विद्या शाखा

● प्रथम वर्ष वाणिज्य अभ्यासक्रमासाठी १२ वी (वाणिज्य) प्रमाणपत्र परीक्षा माध्यमिक उच्च-माध्यमिक शिक्षण मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित किंवा समकक्ष परीक्षा (इतर मंडळ - विद्यापीठे) इंग्रजी हा विषय घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरतात.

## विज्ञान शाखा

- प्रथम वर्ष विज्ञान अभ्यासक्रमासाठी १२ वी (विज्ञान) प्रमाणपत्र परीक्षा उच्च - माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य व्दारा आयोजित किंवा समकक्ष परीक्षा (इतर मंडळे आणि विद्यापीठे) इंग्रजी सह विज्ञान शाखेतील खालील पैकी कोणतेही तीन विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशास पात्र मानले जाते.:- भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित, भूगोल
- जे विद्यार्थी फॉर्म नं. १७ भरुन १२ वी बहिःस्त परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील त्यांना प्रथम वर्ष (विज्ञान) अभ्यासक्रमासाठी प्रवेशास पात्र मानले जाणार नाही.
- जे विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित डिप्लोमा परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, त्यांना प्रथम वर्ष (कला-वाणिज्य, विज्ञान) या अभ्यासक्रमासाठी प्रवेशास मान्यता मिळते.

## शुल्क परताव्याचे नियम

### पदवी पूर्व विभाग

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. १२६/२००३ आणि १४३/२००३ नुसार शुल्क परतावा करण्याबाबतची विहित नियमावली पुढील प्रमाणे आहे.

१) प्रवेशापासून पंधरा दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास पूर्ण शुल्क परत केले जाते.

२) प्रवेशापासून पंधरा ते तीस दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास फक्त शैक्षणिक शुल्क परत केले जाईल आणि या शिवाय २० % रक्कम इतर शुल्कातून वजा केली जाते.

३) प्रवेशापासून तीस दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास कोणत्याही प्रकारचे शुल्क परत दिले जात नाही.

४) अर्थिकदृष्ट्या मागास, प्राथमिक शिक्षक पाल्य, स्वातंत्र्य सैनिक पाल्य यांनी प्रवेश घेतल्यापासून पंधरा दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास अनामत रक्कम परत दिली जात नाही.

### पदव्युत्तर विभाग

- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. १२७/२००४ नुसार शुल्क परतावा बाबतची विहीत नियमावली पुढील प्रमाणे आहे.

१) प्रवेश घेतल्यापासून ७ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास शैक्षणिक शुल्कातून १० % रक्कम आणि त्यासोबत रु. ५००/- (पाचशे) मात्र कापले जातात.

२) प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास शैक्षणिक शुल्कातून त्याच्या २५ % रक्कम आणि त्यासोबत रु. ५००/- (पाचशे) मात्र कमी केले जातील.

३) प्रवेशानंतर तीस दिवसांनी प्रवेश रद्द केल्यास कोणत्याही प्रकारचे शुल्क परत केले जाणार नाही.

## शिस्तीचे नियम

१) महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने वेळोवेळी केलेले सर्व शिस्तविषयक नियम विद्यार्थ्यांनी पाळणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या परिसरातील वर्तणूक चांगली ठेवणे बंधनकारक असून त्याबाबतचा अधिकार व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

३) विद्यार्थ्यांनी कोणत्याही योग्य कारणाशिवाय तासिकांना व प्रात्यक्षिकांना गैरहजर राहू नये. कोणत्याही गैरहजेरीच्या परवानगीसाठी उपप्राचार्यांकडे अर्ज करावा.

४) कोणत्याही विद्यार्थ्याला राजकीय, समाजविघातक, हिंसक अशा प्रकारच्या संघटनांच्या कामकाजात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेता येणार नाही.

५) संस्थेच्या आवारातील महाविद्यालय-वसतिगृहाच्या इमारतीत फर्निचर, पंखे, विजेचे साहित्य, प्रयोग शाळेतील सामुग्री इत्यादींची मोडतोड करु नये.

६) प्रवेश घेतल्यानंतर त्वरीत विद्यार्थ्यांनी ओळखपत्र तयार करणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थी/ विद्यार्थिनींना दंड आकारण्यात येईल.

७) महाविद्यालयाच्या परिसरात वावरतांना प्रत्येक वेळी ओळखपत्र जवळ बागळणे आवश्यक आहे.

८) महाविद्यालयाच्या परिसरात धूम्रपान, ड्रग, नार्कोटिक्स, तंबाखू, गुटखा इत्यादी अमली पदार्थाचा वापर निषिध्द आहे. अशा अंमली पदार्थाचा वापर करणाऱ्यावर मुंबई पोलीस नियमावली १९५१ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

९) रॅगिंग - शारीरिक, मानसिक छळ यासारख्या विघातक कृत्यांवर पूर्णतः बंदी असून असे कृत्य करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

१०) महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल फोनचा गैरवापर करू नये.

११) एका विद्यार्थ्यांला एका दुचाकीसाठी एकच स्टिकर दिले जाईल. स्टिकर नसलेल्या दुचाकींना महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश मिळणार नाही.

१२) प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी/विद्यार्थीनीसाठी महाविद्यालयाने निर्धारित केलेला गणवेश घालणे बंधनकारक आहे.

### माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत नियुक्त अधिकारी

**माहितीचा अधिकार कायदा २००५ नुसार खालील अधिकारी नियुक्त आहेत.**

**जनसंपर्क अधिकारी : कुलसचिव**

**प्रथम अपीलीय अधिकारी : प्राचार्य**

**टीप :- मराठी मधील माहिती पत्रकामध्ये काही अडचणी असल्यास इंग्रजी मधील माहिती मूळ माहिती म्हणून ग्राह्य धरावी.**



# शिष्यवृत्ती विभाग

सन २०१८-१९ या वर्षापासून शिष्यवृत्ती व फ्रीशिप योजनांचे नवीन व नुतनीकरणाच्या ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यासाठी राज्यशासनामार्फत **MahaDBT Portal** सूरू करण्यात आलेले असून विद्यार्थ्यांनी **www.mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळवरून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

शिष्यवृत्ती व फ्रीशिप योजनेसाठी शासनाने वेळोवळी निश्चित केलेली कार्यपद्धती, अटी, शर्ती व निकष लागू राहतील.

| अ.नं. | शिष्यवृत्ती/फ्रीशिप | जातीचा संवर्ग | विभाग | उत्पन मर्यादा | पात्रता | आवश्यक कागदपत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | भारत सरकार पोस्ट - मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना | एस.सी. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | आई वडिलांचे / पालकांचे उत्पन्न रु.2.5 लाख किंवा त्यापेक्षा कमी | विद्यार्थी अनुसूचित जातीचा किंवा नवबौध्द असावा. | 1) आई वडिलांचे / पालकाचे उत्पन्न प्रमाणपत्र (तहसिलदार प्रदान) |
| 2) | पोस्ट -मॅट्रीक ट्युशन फी आणि परीक्षा फी (फ्रीशिप) | एस.सी. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | आई वडिलांचे / पालकांचे उत्पन्न रु.2.5 लाखापेक्षा जास्त (मर्यादा नाही) | विद्यार्थी अनुसूचित जातीचा किंवा नवबौध्द असावा. | 2) जात प्रमाणपत्र<br>3) जात वैद्यता प्रमाणपत्र (फक्त व्यवसाईक अभ्यासक्रमासाठी) |
| 3) | व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यासाठी देखभाल भत्ता | एस.सी. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | उत्पन्नाची मर्यादा भारतसरकारच्या शिष्यवृत्ती योजनेनुसार लागू | व्यावसायिक अभ्यासक्रम शिकत असलेले आणि वसतिगृहात राहत असलेले विद्यार्थी पात्र असतील (शासकीय किंवा संस्थेच्या वसतिगृहात किंवा बाहेर राहणारे) | 4) 10 वी व 12 वी परिक्षेची गुणपत्रिका<br>5) गत वर्षीच्या परिक्षेची गुणपत्रिका |
| 4) | पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती अपंग व्यक्तींसाठी | कोणताही संवर्ग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | उत्पन्नाची मर्यादा भारतसरकारच्या शिष्यवृत्ती योजनेनुसार लागू | विद्यार्थी विकलांग व्यक्ती असावा (40% किंवा जास्त) | 6)अधिवास दाखला (डोमीसाईल) |
| 5) | भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती | एस.टी. | आदिवासी विकास विभाग | आई वडिलांचे / पालकांचे उत्पन्न रु.2.5 लाख किंवा त्यापेक्षा कमी | विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. | 7) शिक्षणात खंड बाबतचे आणि स्वःघोषणापत्र(आवश्यक असेल तर) |
| 6) | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क (फ्रीशिप) | एस.टी. | आदिवासी विकास विभाग | आई वडिलांचे / पालकांचे उत्पन्न रु.2.5 लाखापेक्षा जास्त (मर्यादा नाही) | विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. | 8) प्रतिज्ञा पत्र (डिक्लेरेशन) |
| 7) | व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता निर्वाह भत्ता | एस.टी. | आदिवासी विकास विभाग | आई वडिलांचे / पालकांचे उत्पन्न रु.2.5 लाख किंवा त्यापेक्षा कमी | विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. | 9) मृत्यु प्रमाणपत्र (आईवडील नयत असतील तर) |
| 8) | छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | खुला /इ.बी.सी. | उच्च शिक्षण संचालनालय | आई वडिलांचे / पालकांचे उत्पन्न रु.8 लाखापेक्षा कमी | विद्यार्थी खुला संवर्गाचा असावा. | 10) एल.सी./ टी.सी. ज्या महाविद्यालयातून आलेले असाल त्या महाविद्यालयाचे असावे. |
| 9) | माजी सैनिकांच्या पाल्याना आर्थिक सहाय्य योजना | फक्त माजी सैनिकांचा पाल्य | उच्च शिक्षण संचालनालय | जिल्हाधिकारी आणि झीएसएसए बोर्डाचे अध्यक्ष यांचेकडून देण्यात येणारे पात्रता प्रमाणपत्र | विद्यार्थी कोणत्याही संवर्गाचा असावा | 11) रेशन कार्ड |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 10) | एकलव्य आर्थिक सहाय्य योजना | कोणताही संवर्ग (फक्त मास्टर डीग्रीसाठी) | उच्च शिक्षण संचालनालय | आई वडिलांचे / पालकांचे उत्पन्न रु.75000 पेक्षा कमी असावे | कला व वाणिज्य शाखेसाठी 60% व विज्ञानसाठी शाखेसाठी 70% पेक्षा जास्त गुण असावे | 12) प्रवेश पावती<br>13) वसतीगृह प्रमाणपत्र (आवश्यक असेल तर) |
| 11) | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | कोणताही संवर्ग | उच्च शिक्षण संचालनालय | नाही | 12 वी ची परीक्षा 60% गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक आहे | 14) फीस पावती (फक्त एम.एस्सी व प्रोफेशन कोर्सेससाठी |
